**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,**
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२२१७ ई-मेल आय डी क्र- dydepune@gmail.com वेब साईट- www.dydepune.com

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०२/बायोमेट्रीक/पुवि/२०१८/४७०३
दिनांक :- 29 JUN 2018

प्रति,

प्राचार्य/ मुख्याध्यापक,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये/उच्च माध्यमिक विद्यालये,
अनुदानित/विनाअनुदानित /अंशतः अनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित
अहमदनगर/पुणे/सोलापूर

**विषय : उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रीक पध्दतीने सुरु करण्याबाबत**

**संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण -२०१८/प्र.क्र.१३०/१८/एसएम-३ दि. १५.०६.२०१८**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात येते की, राज्यातील सर्व खाजगी अनुदानित/विनाअनुदानित / अंशतः अनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयातील (विज्ञान शाखा) विद्यार्थ्यांची उपस्थिती यापुढे बायोमेट्रीक पध्दतीने सुरु करण्याचा निर्णय संदर्भिय शासन निर्णयान्वये शासनाने घेतलेला आहे.

बायोमेट्रीक उपस्थिती सुरु करण्याकरिता आवश्यक यंत्रसामुग्री कनिष्ठ महाविद्यालयांनी / उच्च माध्यमिक विद्यालयांनी हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत स्वतः उपलब्ध करुन घ्यावी.

संबधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सदर कनिष्ठ महाविद्यालयात बायोमेट्रीक पध्दत सुरु करण्यात आली आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करुन त्यासंदर्भातील अहवालस शासनास सादर करावायाचा आहे. तसेच सदर कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालयांना आकस्मिक भेट देऊन बायोमेट्रिक उपस्थितीचा वेळोवेळी आढावा घ्यावयाचा आहे.

जी कनिष्ठ महाविद्यालये/उच्च माध्यमिक विद्यालये बायोमेट्रिक उपस्थितीबाबत आवश्यक कार्यवाही करणार नाहीत, त्यांच्या विरुध्द् मान्यता काढून घेण्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात येणार आहे.

कनिष्ठ महाविद्यालयांची/उच्च माध्यमिक विद्यालयांची पटपडताळणी कार्यभार निश्चिती व संच मान्यता शिवीरामध्ये सादर केलेल्या नस्तीसोबत विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची बायोमेट्रीक उपस्थिती सादर करणे अनिवार्य आहे. संच मान्यता शिवीरामध्ये बायोमेट्रीक उपस्थिती पत्रक सादर न केल्यास संबधित कनिष्ठ महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पटपडताळणी कार्यभार निश्चिती / संच मान्यता करण्यात येणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी संस्था/कनिष्ठ महाविद्यालयांची राहील याची नोंद घ्यावी.

**सोबतः- संदर्भिय शासन निर्णय**

(स्वाक्षरी)
**(मिनाक्षी राऊत)**
**प्र.शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग पुणे-१**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१
मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी रवानाः-**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे/अहमदनगर/सोलापूर यांना कळविण्यात येते की, शासन निर्णयात नमुद केल्यानुसार आपल्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालये/उच्च माध्यमिक विद्यालये यांना आपले स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. तसेच संदर्भिय शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

Scanned by CamScanner

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रीक पध्दतीने सुरु करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१८/प्र.क्र.१३०/१८/एस.एम.-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:-१५ जून, २०१८

**प्रस्तावना :**

राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील (विज्ञान शाखा) विद्यार्थी नियमित वर्गांना उपस्थित न रहाता फक्त प्रात्यक्षिक वर्गाला उपस्थित राहतात व नियमित वर्गाऐवजी कोचिंग क्लासमध्ये उपस्थित राहतात. तसेच, अनेक कनिष्ठ महाविद्यालयांनी याकरीता खाजगी शिकवणी वर्गांसोबत सामंजस्य करार केला आहे. सदर महाविद्यालयातील विद्यार्थी शिकवणी वर्गात उपस्थित राहतात व नियमित वर्गांना अनुपस्थित राहातात अशा स्वरुपाच्या तक्रारी सुध्दा प्राप्त झाल्या आहेत. तसेच, यासंदर्भात विधीमंडळ सदस्यांनी वेळोवेळी सभागृहात प्रश्न उपस्थित केले आहेत. या सर्व प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील (विज्ञान शाखा) विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रीक पध्द्तीने सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील सर्व खाजगी अनुदानित/ विनाअनुदानित/ अंशत: अनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयातील (विज्ञान शाखा) विद्यार्थ्यांची उपस्थिती यापुढे बायोमेट्रीक पध्द्तीने सुरु करण्याचा निर्णय याव्दारे घेण्यात येत आहे.

२. सदर योजना ही टप्प्या टप्प्याने कार्यान्वित करण्यात येत असून २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व औरंगाबाद या पाच विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील (विज्ञान शाखा) विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रीक पध्द्तीने घेण्यात यावी.

३. बायोमेट्रीक उपस्थिती सुरु करण्याकरीता आवश्यक यंत्रसामुग्री कनिष्ठ महाविद्यालयांनी हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत स्वत: उपलब्ध करुन घ्यावी.

४. संबंधित शिक्षणाधिकारी (माध्य.)/ शिक्षण निरीक्षक यांनी सदर कनिष्ठ महाविद्यालयांत बायोमेट्रीक पध्दत सुरु करण्यात आली आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करुन त्यासंदर्भातील अहवाल शासनास सादर करावा. तसेच सदर कनिष्ठ महाविद्यालयांना आकस्मिक भेट देऊन बायोमेट्रीक उपस्थितीचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

Scanned by CamScanner

५. जी कनिष्ठ महाविद्यालये बायोमेट्रीक उपस्थितीबाबत आवश्यक कार्यवाही करणार नाहीत, त्यांच्याविरुध्द मान्यता काढून घेण्यासंदर्भातील उचित कारवाई करण्यात येईल.

६. संलग्नीत मंडळाचे महाविद्यालयातील उपस्थितीचे निकष पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

७. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१८०६१५१४१७०१४६२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swati
Madhukar
Nanal

[redacted]

(स्वा.म. नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, माध्य. व उच्च माध्य. शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे.
४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
५. सर्व शिक्षणाधिकारी (माध्य.)/ शिक्षण निरीक्षक.

**प्रत माहितीस्तव :-**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. निवड नस्ती (एम.एम.-३).



Scanned by CamScanner